# नियमित दिवाणी दावा क्र.११५/२०१४ मधील नि.२१ खालील आदेश

प्रतिवादींनी त्यांच्याविरुध्द विना कैफियत दावा चालविण्यात यावा असा जो आदेश पारीत झालेला आहे तो रददबातल ठरवून कैफियत दाखल करुन घ्यावी, अशा आशयाचा अर्ज दिलेला आहे. कैफियत वेळेत दाखल न करण्यामागचे कारण त्यांना जुन्या कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यास उशिर झालेला आहे. जाणुनबुजून उशिर केलेला नाही. तरी अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जास आपले म्हणणे देवून सांगितले की, अर्जातील कारण संयुक्तिक नाही. मुददामहून उशिर लावला आहे. तेव्हा त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अन्यथा जास्तीत जास्त खर्चाची आकारणी करण्यात यावी.

४. वादीने प्रस्तुत दावा, दावा मिळकतीचे मालकी हक्काचे हक्कज्ञापन होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील कथन पाहता सन १९५२ पासूनची हकीकत दाव्यात नमूद केलेली दिसते. वादीने दाव्याच्या कामी हक्कज्ञापनाबाबत मालकी हक्क दाखविणारा कोणताही पुरावा दाखल केला नाही. दाव्यातील वादमुददे अंतिमरित्या निकालात काढण्याकरिता आवश्यक पुरावा आणण्याची जबाबदारी ही वादीची असते. दाव्यातील कथन हे फार जुन्या कालावधीपासूनचे असलेले दिसते. परंतु कायदयात तरतूद केल्याप्रमाणे ९०

दिवसांच्या आत कैफियत दाखल करण्याची जबाबदारी ही प्रतिवादींची होती व आहे. कागदपत्रांची जुळवाजुळव ही बाब संयुक्तिक कारण म्हणून विचारात घेता येत नाही. वादीने दाव्याच्या कामी आपले सरतपासणी शपथपत्र दाखल केलेले आहे. दाव्यातील वाद्मुददे अंतिमरित्या निकालात काढण्याकरिता दोन्ही बाजूंच्या पक्षकारांना आपला पुरावा दाखल करण्याची संधी दिली पाहिजे. म्हणून प्रस्तुत अर्ज प्रतिवादींना खर्चाची आकारणी करुन मंजूर करावा या मतास मी आलो आहे. म्हणून आदेश खालीलप्रमाणे.

## **आ दे श**

१. प्रतिवादींचा प्रस्तुत अर्ज त्यांना संयुक्तिकरित्या रक्कम रुपये ३००/-ची खर्चाची आकारणी करुन मंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम प्रतिवादींनी भरल्यास ती रक्कम तालुका विधी सेवा समिति कडेगांव यांच्याकडे जमा करण्यात यावी.

sdxx
(वि.र.दासरी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कडेगांव.

कडेगांव.
ता.०४.११.२०१५